## म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.३७/२०२४ मधील निशाणी क्र. ६ वरील आदेश
## (CNR NO-MHNS-2000-1438-2024)

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार हिने तिच्याकरिता व तिच्या मुलाकरिता सामनेवालेंविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) अर्जदार हिचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा विवाह दिनांक ३१.०८.२०२० रोजी देवपुर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे मोठया थाटामाटात झाला. सदर विवाहसंबंधातुन अर्जदार हिस सामनेवाला क्र. १ पासुन एक अपत्य नामे विहान नितीन देशमुख झाला. अर्जदार व जाबदेणार क्र. १ याचे विवाहसंबंध आजतागायत अस्तित्वात आहे व मुलगा विहान हा आजरोजी अर्जदार यांच्याकडे आहे.

३) अर्जदार हिच्या कथनानुसार सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार हिचा स्वतःहुन त्याग करुन माहेरी काढुन दिलेले आहे. तसेच अर्जदार हिचे संपुर्ण स्त्रीधन सोनेचांदीचे दागदागिने सामनेवाला क्र. १ यांनी स्वतःकडे ठेवुन घेतलेले आहे. अर्जदार हिस माहेरी राहुन लाजिरवाणे जीवन जगावे लागते आहे. याउलट सामनेवाला क्र. १ हा आजरोजी पुणे येथे खाजगी नोकरी करत असुन त्यापासुन त्यास दरमहा अंदाजे रक्कम रु. ६०,०००/– पगार मिळतो. तसेच सामनेवाला क्र. १ याची स्वतःच्या मालकीची दीड एकर पंचवीस गुंठे इतकी वडिलोपार्जित बागायतील जमिन व विहिर आहे व सदर बागायती जमिनीतुन येणारे वार्षिक आर्थिक उत्पन्न सामनेवाला क्र. १ यास मिळते. तसेच त्याची स्वतःची कार व दुचाकी गाडी आहे. सामनेवाला क्र. १ याचेवर अर्जदार व मुलगा विहान यांचे शिवाय इतर कोणाचीही जबाबदारी नाही. तसेच त्याने अर्जदार व मुलगा विहान यांचे अन्नवस्त्र, पालनपोषण, औषधउपचार तसेच मुलगा विहान याचा शैक्षणिक खर्च याची कुठलीही तरतुद आजपर्यंत करुन दिलेली नाही. त्यामुळे अर्जदार व मुलगा विहान यांस सामनेवाला क्र. १ याचेकडुन अंतरिम अन्नवस्त्र खावटी पोटगी दरमहा प्रत्येकी रक्कम रु. २०,०००/– याप्रमाणे मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४) अर्जदारांच्या सदरच्या अंतरिम अर्जास नि.क्र. १८ वर सामनेवालेंतर्फे जबाब देण्यात

आला आहे. सामनेवालेंच्या कथनानुसार अर्जदार व सामनेवाला क्र. १ चे लग्न दिनांक ३१.०८.२०२० रोजी देवपुर येथे झाले व सदर लग्न हे अर्जदाराची मावस बहिण सविता सचिन देशमुख हिच्या मध्यस्थिने ठरविण्यात आले होते. सामनेवाला क्र. १ चे शिक्षण एम.फार्म पर्यंत झालेले असुन सामनेवाला क्र. १ लग्नाच्यावेळी मुंबई येथे नोकरीस होता व अर्जदाराचे शिक्षण बी.एस.सी पर्यंत झालेले असुन लग्नानंतर अर्जदार ही सामनेवालेंकडे कोतुळ येथे नांदणेस आली असता सुरुवातीला १५ दिवस नांदली. सामनेवाला क्र. १ हा मुंबईस नोकरीस असल्याने तो ८ दिवसांनी सुट्टीस गावी येत असे. सामनेवाला क्र. १ हा गावी आल्यानंतर अर्जदाराकडे शारीरीक सुखाची मागणी केली असता अर्जदार ही सामनेवाला क्र. १ वर संशय घेत असे व सामनेवाला क्र. १ यास शरीर सुख देण्यास नकार देत असे. सुरुवातीचे काही दिवस सामनेवाला क्र. १ याने त्याबाबत अर्जदार हिस काही तक्रार केली नाही. अर्जदार सुशिक्षित असुन देखील शरीर सुख देणेस का नकार देते याबाबत तिला विचारणा केली असता ती म्हणत असे की, ''मला लवकर मुलबाळ नको आहे'' यावरुन अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचेमध्ये वाद होवु लागले. त्यामुळे नाईलाजाने सदर बाब सामनेवाला क्र. १ ने अर्जदार हिचे आईवडिलांना व मध्यस्थांना सांगितली व अर्जदार हिस तिचे आईवडिल लग्नाच्या दोन महिन्यानंतर माहेरी घेवुन गेले त्यानंतर अर्जदार हिने महिनाभर सामनेवालेसोबत कोणताही संपर्क साधला नाही.

५) त्यानंतर सामनेवाले यांनी मध्यस्थिंशी संपर्क साधुन बैठक घेतली व सदर बैठकीत अर्जदार हिस तिचे मावस बहिणीने समजावुन सांगितले. त्यानंतर अर्जदार हि सामनेवाला क्र. १ सोबत कोतुळ येथे नांदणेस गेली व अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा संसार सुरु झाला परंतु अर्जदाराचे मन संसारात रमले नाही. काहीही कारण नसताना अर्जदार ही सामनेवाला क्र. १ व त्याच्या आईशी वाद घालत असे. दरम्यानचे काळात अर्जदार हिस दिवस गेले व त्यानंतर अर्जदाराने गर्भपात करु असा आग्रह सामनेवाला क्र. १ कडे केला. सामनेवाला क्र. १ याने सदर गोष्टीस नकार केला असता अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ सोबत भांडणतंटा केला. दरम्यान सातवा महिना लागला असता सामनेवाला क्र. १ चा भाचा अर्जदार हिस भेटण्यास आले असता अर्जदारास एकत्र जेवणाचा आग्रह केला. परंतु अर्जदार नंतर जेवते असे सांगुन जेवली नाही व नंतर उशीरा जेवण्यास बसल्यानंतर भाजी कमी पडली असे खोटे अर्जदाराने तिचे आईस सांगितले असता अर्जदाराचे आईवडिल कोतुळ येथे येवुन सामनेवालेस काही न विचारता दिनांक २६.०६.२०२१ रोजी अर्जदारास घेवुन गेले. घडलेला सर्व प्रकार सामनेवाला क्र. १ याने

अर्जदाराचे मावस बहिणीस सांगितला असता ती म्हणाली की, ''डिलेव्हरी होवु द्या, त्यानंतर आपण पुन्हा बैठक घेवु'', म्हणुन सामनेवाला क्र. १ हा शांत राहिला परंतु दरम्यानचे काळात अर्जदाराने सामनेवाला क्र. १ याच्याशी कुठलाही संपर्क ठेवला नाही. त्यानंतर डिलेव्हरीसाठी अर्जदारास दिनांक ०२.०९.२०२१ रोजी दवाखान्यात दाखल केल्यानंतर अर्जदाराचे वडिलांनी सामनेवाले यांना फोन करुन अर्जदारास डिलेव्हरीसाठी ॲडमिट केले आहे, सिझेरीयन साठी पैसे लागणार आहे, पैसे घेवुन या असा फोन केला त्यामुळे दिनांक ०३.०९.२०२१ रोजी मातोश्री हॉस्पीटल मध्ये सामनेवाले यांनी रुपये वीस हजार डिपॉझीट केले व अर्जदार हिस मुलगा झाला व डिलेव्हरीचे संपुर्ण रक्कम रु. ५०,०००/– सामनेवाला क्र. १ ने भरुन अर्जदार हिस तिचे माहेरी सोडले.

६) त्यानंतर सामनेवाला क्रि. १ हा दिवाळीचे अगोदर अर्जदार हिस आणण्यासाठी तिचे माहेरी गेला असता अर्जदाराने कोतुळ येथे येण्यास नकार दिला. त्यामुळे मध्यस्थांमार्फत पुन्हा बैठक बसविण्यात आली. परंतु अर्जदार व तिच्या घरच्यांनी दिवाळीचे सणानंतर नांदणेस मुलीला पाठवु असे सांगितले. दरम्यानचे काळात जुन २०२१ पासुन सामनेवाला क्र. १ ने त्याची मुंबई येथील नोकरी सोडुन सिन्नर येथे फार्मसीटी या कंपनीत नोकरी मिळवली. सामनेवाला क्र. १ यास खरोखर नोकरी आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी सामनेवाला क्र. १ कडे अर्जदाराचे वडील, भाउ व इतर दोन इसम सदर कंपनीमध्ये येवुन चौकशी करुन गेले. याबाबत सामनेवाला क्र. १ ने अर्जदार व तिच्या वडिलांना विचारणा केली असता त्याचा राग येवुन अर्जदाराच्या वडील व भाउ यांनी दमदाटी करण्यास सुरुवात केली. सामनेवाला क्र. याने अर्जदाराचे मामास संपर्क साधला. अर्जदाराचे मामांनी तिला समजावुन सांगितले परंतु तिला नांदणेस आणुन घातले नाही. अशा प्रकारे जुन २०२० पासुन अर्जदार हि माहेरीच राहत आहे. सामनेवाला क्र. १ हा बाळाचे वडील असुन त्याला नेहमी मुलाची आठवण येते. परंतु सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिस घेण्यासाठी तिच्या माहेरी आल्यावर अर्जदार व तिचे आईवडिल नेहमीच तिच्याशी भांडण करतात.

७) सामनेवाले यांनी दिनांक २९.०१.२०२२ रोजी ॲड. श्री. आर. डी. नवले यांचे मार्फत अर्जदार यांना नोटीस पाठविल्यानंतर अर्जदाराने त्यांना बैठकीसाठी त्यांचे गावी बोलावले. अर्जदाराने बैठकीमध्ये असे सांगितले की, कोतुळ येथे रहायला येणार नाही, सिन्नर येथे रहायला

येत असात तर मी नांदायला येईल असे सांगितले. त्यामुळे सामनेवाला क्र. १ याने दिनांक ०१.०४.२०२२ रोजी सिन्नर येथे रुम घेवुन अर्जदार, सामनेवाला क्र. १ व त्याची आई तेथे राहण्यास गेले. तरीदेखील अर्जदार ही वेळेवर जेवण बनवुन देत नसे, दिवसभर आईसोबत फोनवर बोलत असे व घरातील सर्व कामे सामनेवाला क्र. १ च्या आईला करावी लागत असे. तसेच सामनेवाला कामावर गेल्यानंतर अर्जदाराची आई सामनेवाले यांचे घरी विनाकारण येवुन बसत असे. अर्जदार हि तिच्या आईच्या सांगण्यावरुन सामनेवालीच्या आईला जेवण देत नसे.

८) सामनेवाला क्र. १ यांचा मुलगा लहान असल्यामुळे अर्जदारापासुन होणारा त्रास सामनेवाला क्र. १ हा सोडुन देत असे. अर्जदार हि सामनेवाला क्र. १ यास म्हणाली की, मी तुमच्या आईला सांभाळणार नाही. तेव्हा सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस समजावुन सांगितले की, माझी आई गावी एकटी राहु शकत नाही. परंतु अर्जदार हिने काहीही ऐकुन न घेता माहेरी निघुन गेली. सामनेवाला क्र. १ हा त्याच्या आईसोबत सिन्नर येथे राहत असताना अर्जदाराचा चुलत भाउ सामनेवाला क्र. १ याच्या घरी येवुन त्याच्या आईला जिवे मारण्याची धमकी देत असे व सामनेवाला क्र. १ यास देखील अर्जदाराचा भाउ त्याच्या कंपनीमध्ये जावुन जिवे मारण्याची धमकी देत असे व शिवीगाळ करत असे.

९) सामनेवाला क्र. १ याने जन २०२२ ला हिंदु विवाह कायदा कलम ९ नुसार नांदण्यास येणेकामी मे. ज्युडी.मॅजि. सो.वर्ग–१, संगमनेर येथील न्यायालयात एच.एम.पी क्र. २७१/२०२२ दाखल केली. त्यानंतर अर्जदार हिचे चुलत मामा यांनी सामनेवाला क्र. १ यास फोन करुन बोलावुन घेतले व सांगितले की, तुम्ही दोघे एकत्र रहा म्हणजे भांडण होणार नाही. सप्टेंबर महिन्यामध्ये सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिस नांदण्याकामी घेवून आला. परंतु अर्जदार हि फक्त ४ ते ५ दिवस व्यवस्थीत राहिली. त्यानंतर पुन्हा तिने पुर्वीसारखे वागणे सुरु केले. त्यानंतर नोव्हेंबर २०२२ मध्ये सामनेवाला क्र. १ च्या भावाचे लग्न असल्याने अर्जदार व सामनेवाला क्र. १ ४ ते ५ दिवस सामनेवाला क्र. १ यांच्या गावाला गेले असता अर्जदार हिने मुलाला शेंगदाणे खाण्यास दिले, तो आजारी होता. परंतु अर्जदार हिने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर अर्जदार व सामनेवाला क्र. १ हे पुन्हा सिन्नरला आल्यानंतर मुलाने मान टाकुन दिली हे सामनेवाला क्र. १ च्या लक्षात आले असता त्याला सिन्नर येथील कुठल्याही दवाखान्यात घेतले नाही. त्यानंतर सामनेवाला क्र. १ याने रात्री ११ वाजेच्या सुमारास मुलाला

नाशिक येथे दवाखान्यात ॲडमिट केले. मुलाच्या उजव्या बाजुची श्वसन नलिका बंद झाली होती व त्यावर शस्त्रक्रिया करुन अडकलेले शेंगदाणे बाहेर काढले. हॉस्पीटलचे दिड लाख रुपये बिल सामनेवाला क्र. १ यानेच भरले. त्याला घरी सोडल्यानंतर देखील अर्जदार हि त्याच्याकडे लक्ष देत नव्हती.

१०) जानेवारी २०२३ मध्ये अर्जदार हि तिच्या गावाची यात्रा असल्यामुळे पुन्हा तिच्या माहेरी गेली. त्यावेळेस पुन्हा मोबाईलचा छोटा सेल मुलाच्या पोटात गेला. तेव्हासुध्दा सामनेवाला क्र. १ याने मुलाला नाशिक येथे उपचारासाठी दाखल करुन पन्नास हजार रुपये बिल भरले. त्यानंतर मार्च महिन्यामध्ये अर्जदार हिचा भाउ बारावी पास झाला असता त्याचे ॲडमिशनसाठी अर्जदार हि सामनेवाला क्र. १ कडे एक लाख रुपये मागु लागली व पैसे दिले तरच मी नांदेल अशी सामनेवाला क्र. १ यास धमकी दिली. सामनेवाला क्र. १ याने पैसे देण्यास नकार दिला असता अर्जदार हि मुलास घेवुन रागामध्ये माहेरी निघुन गेली. शेवटी नाइलाजास्तव सामनेवाला क्र. १ याने वडीलोपार्जित जमिन विक्री केली व अर्जदार हिस एक लाख रुपये तिच्या माहेरी नेवुन दिले. तेव्हा अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यास आठ दिवसानंतर नांदायला येते असे सांगुन परत पैसे मागण्यास सुरुवात केली. अर्जदार हिचे वडिलांवर तीन लाख कर्ज रुपये आहे ते भरण्याकामी अर्जदार हिने पुन्हा सामनेवाला क्र. १ कडे पैश्याची मागणी केली. तेव्हा सामनेवाला क्र. १ याने जुनमध्ये तीन लाख रुपये रोख स्वरुपात अर्जदार हिची मावस बहिण व नवरा सचिन देशमुख यांचे समक्ष अर्जदार हिने पैसे घेतले. तरीदेखील अर्जदार हिने नांदण्यास नकार दिला.

११) सामनेवाला क्र. १ हा मुलाला भेटण्यासाठी गेला असता त्याला अर्जदाराच्या वडील व भावाने मारहाण केली व आजुबाजूच्या लोकांना बोलावुन दम दिला व धमकी दिली. अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ च्या विरोधात डिसेंबर २०२३ मध्ये नाशिक येथील महिला आयोग, आडगांव येथे खोटया आशयाची तक्रार दाखल केली व वारंवार सामनेवाला क्र. १ यास त्रास देत असे. सदरचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नसताना देखील अर्जदार हिने मे. ज्युडी,मॅजि. सो. वर्ग–१, सिन्नर या न्यायालयात फौ.चौ.अर्ज क्र. ३७/२०२४ हा खोटया आशयाचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार हिने कधीही मुलाचा सांभाळ केलेला नाही. अर्जदार हिने तिचे कुटुंबियांमार्फत सामनेवाला क्र. १ ते ५ यांना विनाकारण त्रास देण्याकामी

सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्याची विनंती सामनेवालेंतर्फे करण्यात आली आहे.

१२) उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या कथनावरुन उपस्थित झालेली बाब व त्यावरील माझा निष्कर्ष कारणमिमांसे सह पुढीलप्रमाणे नमुद करत आहे.

| अ.क्र. | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार व तिचा मुलगा हे अंतरिम पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ? | होय. अर्जदार व तिचा मुलगा यांना एकत्रित दरमहा रु. ८०००/– प्रमाणे |
| २ | आदेश काय ? | अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>विचारार्थ बाब क्र. १ करीता –</u>**

१३) एकमेकांशी असलेले नातेसंबंध उभयपक्षांना मान्य आहेत. या पार्श्वभुमीवर मुळ अर्जातील कथन पाहता अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार सामनेवाला यांनी तिचा वेळोवेळी शारिरिक व मानसिक छळ केलेला आहे. तिच्या कथनानुसार अर्जदार सासरी नांदायला गेल्यावर सामनेवाला क्र. १ ते ४ यांनी किरकोळ कारणावरुन वाद उपस्थित करुन अर्जदाराशी भांडणतंटा सुरु केला. तसेच सामनेवाला क्र. १ हा दुस–या मुलींसोबत चॅट करताना अर्जदाराने पाहिले. त्याबाबतचा जाब अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ यास विचारला असता त्याने तिला मारहाण व शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. तसेच एकेदिवशी सामनेवाला क्र. १ याने तिला दारु पिवुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच ती गरोदर असताना सामनेवाला क्र. १ व २ यांनी तिला घरातुन हाकलुन दिले. तसेच अर्जदार हिस गरोदरपणात जड कामे करण्यास अर्जदारास भाग पाडले जाई. तसेच सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराकडे पाच लाखाची मागणी केली. तसेच

सामनेवाला क्र. ३ व ४ हे देखील सतत पैशांची मागणी अर्जदाराकडे करत व अर्जदार हिस उपाशी पोटी ठेवत. त्यानंतर अर्जदाराची ०३.०९.२०२१ रोजी सिझेरीयन द्वारे प्रसुती झाली तरी तिला सामनेवाला क्र. १ याने मारहाण केली व तिच्या आईवडिलांना शिवीगाळ केली. त्यानंतर दिनांक १८.०२.२०२३ रोजी सामनेवाला क्र. १ याने तिला माहेरी काढुन दिले. तेव्हापासुन ति तिचे माहेरी राहत असुन सामनेवाला क्र. १ याने तिच्या व तिच्या मुलाच्य उदरनिर्वाहाकरिता कोणतीही व्यवथा केलेली नाही. अर्जदार हिस उत्पन्नाचे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तिच्या कथनानुसार सामनेवाला क्र. १ हा पुणे येथे नोकरीस असुन त्याला प्रतिमहा साठ हजार मासिक उत्पन्न मिळते. तसेच त्याला वडिलोपार्जित शेतीतुन चांगले उत्पन्न मिळते. त्यामुळे तो अंतरिम पोटगी देवु शकतो.

१४) सामनेवाला यांच्या कथनानुसार सामनेवाला क्र. १ हा नोकरी निमित्त मुंबई येथे असतो व तो शनिवार व रविवारी घरी आल्यावर अर्जदाराकडे शरीरसुखाची मागणी करत असे. परंतु अर्जदार ही त्यास शरीरसुख देत नसे. त्यानंतर बैठकीमध्ये समजवल्यावर अर्जदार ही पुन्हा सामनेवाला क्र. १ कडे नांदायला आली. अर्जदार हि सतत सामनेवाला यांच्यासोबत वाद घालत असे व भांडण करत असे. तसेच अर्जदार हि गरोदर राहिल्यावर गर्भपात करण्याची भाषा करत असे. त्याला विरोध केल्यावर खुप भांडणतंटा करत असे. तसेच सामनेवाला क्र. १ सोबत तुसडेपणाने वागत असे. तसेच अर्जदाराच्या प्रसुतीचा सर्व खर्च सामनेवाला यांनी केला. प्रसुतीनंतर अर्जदार सामनेवाला यांच्या घरी आली. त्यानंतर सामनेवाला क्र. १ यास सिन्नर येथे नोकरी लागली. त्याबाबत अर्जदाराच्या आईवडीलांनी व भावाने चौकशी केली. त्याबाबत सामनेवाला क्र. १ याने विचारले असता त्याला त्यांनी दमदाटी करुन उडवाउडवीची उत्तरदिली. अर्जदार प्रसुतीनंतर माहेरी आल्यानंतर ५ महिने होवुनही नांदण्यास आली नाही म्हणुन सामनेवाला अर्जदाराच्या माहेरी गेले असता अर्जदार सामनेवालांशी भांडणतंटा करत असे व त्याला मारहाण करण्याची धमकी देत असे. तसेच सामनेवाला क्र. १ हा त्यानंतर अर्जदारासाठी सिन्नर येथे राहु लागल्यानंतर अर्जदार जेवण बनवत नसे व सामनेवाला क्र. १ या आईला जेवायला देत नसे. अर्जदार हिचा भाउ सामनेवाला क्र. १ यास कंपनीत जावुन जीवे मारण्याच्या धमक्या देत असे. तसेच त्याचा मुलगा आजारी असताना अर्जदाराने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. तसेच सामनेवाला क्र. १ याने अर्जदाराच्या भावाच्या शिक्षणासाठी एक लाख दिले परंतु अर्जदाराचाी पैश्याची मागणी वाढत गेली. तसेच अर्जदाराने डिसेंबर २०२३ मध्ये

सामनेवाला विरुध्द खोटा तक्रारी अर्ज दिला. त्यामुळे सामनेवाला क्र. १ ते ५ यांना आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागला.

१५) अर्जदार यांच्या विधिज्ञांनी मुळ प्रकरणास बराच अवधी लागणार असल्याने व सध्या अर्जदाराकडे तिच्या स्वतःच्या व तिच्या मुलाच्या पालनपोषणाची सोय नसल्याने अंतरिम पोटगी मंजुर करण्याची विनंती केली आहे. सामनेवाला यांच्या विधिज्ञांनी अंतरिम पोटगी मंजुर करु नये याबाबत सामनेवाला यांच्या जबाबाप्रमणे युक्तिवाद केला आहे.

१६) उभयपक्षांचे कथन विचारात घेता त्यांनी एकमेकांविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप केल्याचे दिसुन येते. त्यामुळे उभयपक्षकारांना त्यांचे म्हणणे पुराव्यानिशी सिध्द करण्यास संधी देणे आवश्यक दिसुन येते. निश्चीतच प्रकरणाचा गुणवत्तेर निर्णय देण्यास बराच कालावधी लागणार आहे. उभयपक्षांच्या कथनावरुन अर्जदार हि सामनेवाला क्र. १ बरोबर बराच काळ संसार केल्याचे दिसुन येते. तसेच तिला सामनेवाला क्र. १ याच्यापासुन एक मुलगा देखील आहे. या पार्श्वभुमीवर अर्जदार हि स्वतःहुन माहेरी राहत असल्याचे कथन प्रथमदर्शनी संयुक्तिक दिसुन येत नाही. निश्चीतच अर्जदाराच्या व तिच्या मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ वर आहे. त्यामुळे अर्जदाराचे कथन पाहता प्रथमदर्शनी तिच्याशी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदाराकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसुन येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अर्जदारास व तिच्या मुलास अंतरिम पोटगी मंजुर करणे आवश्यक दिसुन येते.

१७) अर्जदार हिच्या कथनानुसार सामनेवाला क्र. १ हा दरमहा साठ हजार कमवितो व त्याला वडिलोपार्जित मिळकतीतुन देखील उत्पन्न मिळते. सामनेवाला क्र. १ याने त्याच्या मालमत्ता व दायित्वाच्या प्रमाणपत्रामध्ये त्याला चाळीस हजार प्रतिमहा उत्पन्न मिळत असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्याने मागील दोन वर्षाचे आयकर भरले असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्याने त्याच्या सदर शपथपत्रामध्ये प्रतिमहा रक्कम रु. ४०००/– पोटगी देण्याची ईच्छा दर्शविली आहे. तसेच सामनेवाला क्र. १ कडे वाहन कर्ज असल्याचे दिसुन येते. तसेच त्याच्या सदर शपथपत्रावरुन अर्जदार हिस काहीही उत्पन्न नसल्याचे दिसुन येते. अर्जदाराच्या मालमत्ता व दायित्व बाबतच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता ती काहीही कामधंदा करत नाही.

सामनेवाला क्र. १ याचेवर त्याच्या आईवडिलांच्या उपजिविकेचा खर्च असल्याचे त्याने युक्तिवादामध्ये सांगितले आहे. निश्चितच अर्जदार व तिच्या मुलाच्या पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ वर आहे.

१८) सध्यस्थितीला सामनेवाला क्र. १ याच्याकडे दरमहा चाळीस हजार उत्पन्न असल्याचे नमुद केले आहे. तसेच त्यावर काही कर्ज देखील आहे. तसेच अर्जदाराचा व तिच्या मुलाच्या पालनपोषणाचा खर्च, वाढती महागाई, औषधउपचार यांचा खर्च पाहता अर्जदार व तिच्या मुलास दमहा रक्कम रु. ८०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी मंजुर केल्यास त्यातुन तिचे व तिच्या मुलाचे व्यवस्थित पालनपोषण होवु शकते. तसेच सामनेवाला क्र. १ वर देखील अधिकचा भार पडणार नाही. सबब, विचारार्थ बाब क्र. २ च्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. मूळ अर्जाचा गुणवत्तेवर निर्णय होईपावेतो प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून सामनेवाला क्र. १ याने अर्जदार व तिच्या मुलास एकत्रित पालनपोषणाकरिता म्हणून दरमहा रु. ८०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी द्यावी.

३. या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना तसेच संबंधीत पोलीस ठाण्याचे अधिकारी यांना मोफत देण्यात यावी.

४. खर्चाबाबत तुर्तास कुठलाही आदेश नाही.

RUSHIKESH RAMDAS JADHAV
Digitally signed by RUSHIKESH RAMDAS JADHAV
Date: 2025.12.19 16:12:17 +0530

दिनांक – १७.१२.२०२५.

(**ऋ. रा. जाधव**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. २, सिन्नर.

## **CE R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Morankar |
| Court | : | 2nd Jt. Judicial Magistrarte First Class, Sinnar |
| Date | : | 17.12.2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 17.12.2025 |
| Order Uploaded on | : | 19.12.2025 |